# Sane Guruji English Medium School

Bhikoba Waman Pathare Marg, Dadar (W) – 28.

## Std 1 - First Aid Activity , 2025-26



**शाळेच्या मुख्य सभागृहात प्रथमोपचार उपक्रमासाठी बसलेले विद्यार्थी.**





**नाटक चालु असताना मैदानात खेळणारे विद्यार्थी.**





**प्रथमोपचार या विषयवार नाटक सादर करताना शिक्षक व विद्यार्थी.**



**प्रथमोपचार पेटीतील आवश्यक वस्तु दाखवताना व त्यांचे महत्त्व समजावून सांगताना शिक्षक**





**प्रथमोपचार पेटी व त्या मधील विविध वस्तु दाखवताना विद्यार्थी.**

**इयत्ता पहिली**

**प्रथमोपचार उपक्रम**

इयत्ता पहिलीतील मुलांना प्रथमोपचार या विषयावर माहिती देण्यात आली. मुलांना नाटकाद्वारे प्रथमोपचाराचे महत्त्व समजावून सांगितले. या नाटकातून प्रथमोपचाराचे उपयोग आणि फायदे स्पष्ट करण्यात आले. मुलांनी या उपक्रमामध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अधिक माहितीसाठी, मुलांना प्रथमोपचार पेटीतील आवश्यक वस्तू दाखवून, त्यांचे उपयोग समजावून सांगितले.

या उपक्रमांतर्गत, मुलांना स्वतःची प्रथमोपचार पेटी तयार करण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

# Sane Guruji English Medium School

Bhikoba Waman Pathare Marg, Shivaji Park, Dadar (W), Mumbai-400028

STD – II, YOGA ACTIVITY, 2025-2026.












YORK


YORK







**योगा कृती अहवाल - इयत्ता दुसरी**

रोजी मुख्य इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी दिनांक सभागृहात योगा कृतीत सहभाग घेतला. ही कृती त्यांच्या वर्गशिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

योगा कृतीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शांतता, एकाग्रता आणि शिस्तीची सवय निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची योगासने जसे की ताडासन, वृक्षासन, भुजंगासन आणि प्राणायाम मोठ्या उत्साहाने केली.


या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना श्वसनावर नियंत्रण ठेवणे, शरीर संतुलित ठेवणे आणि मन शांत ठेवणे शिकायला मिळाले. संपूर्ण सत्रात मुले खूप आनंदी होती व त्यांनी संपूर्ण कृतीत सक्रिय सहभाग घेतला.

अशा प्रकारच्या क्रिया विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात.

# Sane Guruji English Medium School

Bhikoba Waman Pathare Marg, Dadar (W)- 28.

**Activity 2025 - 2026**





















इयत्ता तिसरी - मास्क तयार करण्याचा उपक्रम

इयत्ता तिसरीसाठी शाळेत "मास्क तयार करण्याचा" एक सर्जनशील उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आवश्यक साहित्य जसे की कागद, रंग, दोरा, कात्री इत्यादी घरातून आणले. शाळेत त्यांनी आपल्या आवडत्या प्राणी किंवा कार्टून पात्राचे रंगीत व आकर्षक मास्क तयार केले.

मुलांनी मोठ्या उत्साहाने हा उपक्रम केला. मास्क तयार झाल्यावर त्यांनी तो परिधान केला आणि त्या प्राणी किंवा पात्राचे हुबेहूब अनुकरण केले. काही विद्यार्थ्यांनी सिंह, वाघ, माकड यांचा आवाज काढून सर्वांना हसवले, तर काहींनी स्पायडरमॅन, डोरेमॉन सारख्या पात्रांची ॲक्शन करून सादरीकरण केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती कौशल्य यांचा विकास झाला. त्यांनी शारीरिक हालचाली, आवाजाची नक्कल आणि अभिनय यातून नाट्यकलेचा अनुभव घेतला. तसेच पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून शाश्वत विकासाचे महत्त्वही शिकले.


शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि त्यांना पुढील उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी प्रेरित केले. एकंदरीतच हा उपक्रम आनंददायी, शैक्षणिक आणि प्रेरणादायी ठरला.


# Sane Guruji English Medium School


Bhikoba Waman Pathare Marg, Dadar (W) – 28.


**STD IV Activity ( 2025 -26 )**


























अहवाल : ‘प्रास्ताविका लेखन व अर्थ समजून घेण्याचा उपक्रम’

आमच्या शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका ह्यावर आधारित उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी घरून A4 आकाराचा कागद आणि रंगीत स्केचपेन आणले होते. अर्थ समजावून घेऊन त्यांचे लेखन व सजावट हे सर्व वर्गातच करण्यात आले.

या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम संपूर्ण प्रास्ताविका सुंदर अक्षरात लिहिली. त्यानंतर त्यातील प्रत्येक महत्त्वाच्या शब्दांचा अर्थ – जसे की सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, समता इत्यादी शिक्षकांनी सोप्या भाषेत समजावून सांगितला व विद्यार्थ्यांनी तो प्रास्ताविकेच्या खाली लिहला. नंतर विद्यार्थ्यांनी आपले कागद आकर्षक पद्धतीने सजवले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यामागचा उद्देश व राष्ट्रीय एकात्मतेची जाणीव झाली. त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात प्रास्ताविका लिहून, त्याचा अर्थ समजून घेतल्यामुळे त्यांना अभिमान वाटला. हा उपक्रम मुलांसाठी माहिती उपलब्ध  करुन  देण्यासोबत आनंददायी आणि सर्जनशील ठरला.

# Sane Guruji English Medium School

Bhikoba Waman Pathare Marg, Dadar (W) – 28.

**Std:- V**


**Anandi Shanivar Activity -1**

**Topic:- Newspaper Activity**










आनंदी शनिवाराच्या निमित्ताने इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी जुन्या इंग्रजी वर्तमानपत्रांचा वापर करून शैक्षणिक आणि सर्जनशील उपक्रम राबवले गेले. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढवणे, सर्जनशीलता आणि कथाकथन कौशल्य विकसित करणे, तसेच पुनर्वापराच्या संकल्पनेविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

सर्वप्रथम "शब्दशोध" हा खेळ घेण्यात आला, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातून दिलेले इंग्रजी शब्द शोधून वर्तुळात घेतले. या कृतीमुळे त्यांची शब्दसंपत्ती वाढली आणि वाचनातील एकाग्रता सुधारली. त्यानंतर "माझे स्वप्न शहर" या विषयावर कोलाज तयार करण्याचा उपक्रम झाला. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील विविध चित्रे कापून रंगीत कागदावर आपापल्या कल्पनेतील शहर रचले. काही विद्यार्थ्यांनी त्यांचे शहर सादरही केले. या उपक्रमामुळे त्यांची कल्पनाशक्ती, सादरीकरण कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागला.

यानंतर विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील दोन ते तीन चित्रे निवडून त्या आधारे एक छोटीशी कथा तयार केली. यामुळे त्यांचे लेखनकौशल्य आणि कथानक बांधणीचे कौशल्य विकसित झाले. शेवटच्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्र वापरून सहा प्रकारच्या टोप्या बनविल्या. या कृतीमुळे त्यांचे हस्तकौशल्य विकसित झाले आणि पुनर्वापराचे महत्त्व अधोरेखित झाले.

सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना आनंददायी व अर्थपूर्ण शिक्षण मिळाले